# प्रशासकीय ठराव

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**ठराव क्रं.** 180 **दि.** 09/02/2024

---

**विषय** - केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना राबविणेच्या कामाच्या निविदा दर मंजुरी बाबत.

**प्रस्ताव -**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांन अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना राबविणेच्या कामासाठी ई-निविदा सुचना क्रं. 10 / 2023-24 Tender ID 2024_LMC_979364_1 मागविण्यात आले होते. ई-निविदा बाबतची माहिती खालील तपशिला प्रमाणे आहे.

1. ई-निविदा मागवलेला दि. 05.01.2024 ते 05.02.2024
2. ई-निविदा उघडणेचा दि. 06.02.2024

प्रस्तावित निविदेस एकुण चार निविदा प्राप्त असल्याचे बिड रिपोर्ट वरुन निदर्शनास आलेनुसार दिनांक 06.02.2024 रोजी निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. यामध्ये 1) आर अँन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. 2) भुगन इन्फ्राकॉन प्रा. लि. 3) व्रज कन्स्ट्रक्शन 4) जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद असे एकुण चार निविदाधारक प्राप्त झाले. सदर निविदा धारकाचे कागदपत्रांची तपासणी निविदा समिती सदस्य यांनी केली असता उपरोक्त निविदाधारकापैकी आर अँन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. व भुगन इन्फ्राकॉन प्रा. लि. हे अपात्र ठरले आहेत. उर्वरीत दोन निविदाधारक व्रज कन्स्ट्रक्शन व जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद हे पात्र ठरल्याने दोन्ही पात्र निविदा धारकांचा अर्थिक लिफाफा उघडण्यात आला. पात्र निविदा धारकांचा दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अनु क्रं. | निविदाकार | अंदाजपत्रकीय रक्कम | प्राप्त दर |
|---|---|---|---|
| 1 | व्रज कन्स्ट्रक्शन | 250,41,17,824/- | 1.00% अधिक म्हणजेच रक्कम रु. 252,91,59,002/- |
| 2 | जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद | | 0.550% कमीचे म्हणजेच रक्कम रु. 249,03,45,176/- |

प्राप्त दोन निविदा धारकाचे दरापैकी सर्वात कमीचे दर जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. 250,41,17,824/- पेक्षा 0.550% कमीने म्हणजे रु. 249,03,45,176/- आहे.

तरी जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद यांचे सर्वात कमीचे 0.550% कमीने म्हणजे रु. 249,03,45,176/- दर मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

**निर्णय :-**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना राबविणेसाठी मे. जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद यांचे सर्वात कमीचे दरास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. शासन परिपत्रकाप्रमाणे प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यात यावा व शासन निर्देशाप्रमाणे आयुक्त यांनी पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

**नगर सचिव**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**प्रशासक**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर